



दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३१८ ■ मंगळवार, दि. १८ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -318 ■ Tuesday, 18 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


# नागपुरात औरंगजेबाच्या कबरीचा वाद पेटला, दोन गटात तणाव, दगडफेक आणि जाळपोळ



नागपूर : औरंगजेबाच्या कबरीभोवती सुरू असलेल्या वादावरून मंगळवारी संध्याकाळी नागपूरच्या महाल परिसरात दोन गटांमध्ये संघर्ष झाल्याने तणाव वाढला आहे. औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी काही संघटनांनी केलेल्या आंदोलनादरम्यान मुस्लिम समुदायाचा पवित्र ग्रंथ जाळल्याच्या अफवांमुळे पोलिसांवर दगडफेक करण्यात आली, ज्यामध्ये दोन जण जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मख्यमंत्र्यांकडून शांततेचे आवाहन

मुख्यमंत्री कार्यालयानुसार, ङ्गनागपूरच्या महाल भागात दगडफेक आणि तणावपूर्ण परिस्थितीनंतर पोलीस प्रशासन परिस्थिती हाताळत आहे. या परिस्थितीत नागरिकांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आम्ही सतत पोलिस प्रशासनाच्या संपर्कात आहोत आणि नागरिकांनी त्यांना सहकार्य करावे. नागपूर हे शांतताप्रिय आणि सहकार्यशील शहर आहे. हीच नागपूरची परंपरा आहे. अशा परिस्थितीत, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि प्रशासनाला पूर्ण सहकार्य करा.ङ्क

चिटणीस पार्क आणि महाल भागात जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. दुपारी उशिरा कोतवाली आणि गणेशपेठ येथेही हिंसाचार पसरल्याची माहिती मिळाली असल्याचे, अधिकाऱ्यांनी सांगितले. काही सम ाजकंटकांनी पोलिसांविरुद्ध निदर्शने करीत रस्त्यावरी वाहनांची तोडफफोड केली. ई रिक्षा आणि ऑटो रस्त्यावर उलटवून रस्ता बंद करण्याचा प्रयत्न केला. रस्त्यावर उभ्या दुचाकींचीसुद्धा तोडफफोड केली. यामध्ये सर्वाधिक नुकसान ई रिक्षाचे झाले आहे. पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला असून, पोलीस आयुक्त,सहआयुक्तांसह सर्वच अधिकारी महालमध्ये दाखल होऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

नेमकं काय आहे प्रकरण?

आज सायंकाळी सात ते साडेसातच्या दरम्यान शिवाजी चौकाजवळ एका गटाने घोषणाबाजी सुरू केली. यामध्ये त्यांचा दुपारी विश्व हिंदू परिषदेच्या आंदोलनासंदर्भात त्यांचा रोष होता, घोषणाबाजी सुरू होताच परिसरातील दुसऱ्या गटानेही घोषणाबाजीला सुरुवात केल्याने वाद वाढला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घोषणाबाजी करणाऱ्या दोन्ही गटांना पांगवले. मात्र, पुढे चिटणीस पार्कच्याकडील भालदारपुरा दिशेने पोलिसांवर दगडफफेक सुरु झाली. त्यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी अश्रु धुराच्या नळकांड्या फोडल्या.

## नागपुरात दंगल नेमकी कशामुळे भडकली ? असा आहे घटनाक्रम

विश्व हिंदू परिषदेच्या जवळपास ३० ते ३५ कार्यकर्त्यांनी दुपारी एक वाजता महाल झेंडा चौकात औरंगजेबाचे छायाचित्र आणि प्रतिकात्मक कबर तयार केली. औरंगजेबाच्या छायाचित्राला चपलेने मारून निषेध व्यक्त केला.

- **दुपारी दोन वाजता :** औरंगजेबाच्या प्रतिकात्मक कबरेला पेटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्या कबरेवर एका धर्मासाठी पवित्र मानण्यात येणारी हिरवी चादर टाकण्यात आली होती. त्यावर कुराणाच्या आयात लिहिलेल्या होत्या. ती चादर पेटवल्याची चर्चा सर्वत्र पसरली.
- दुपारी चारपर्यंत विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते महाल चौकात उपस्थित होते
- विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी पाच वाजता प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना फोन करुन बोलावले, परंतु, पोर्टलच्या पत्रकारांशिवाय कुणीही तिकडे फिरकले नाही.
- औरंगजेबाची प्रतिकात्मक कबरेवरील हिरव्या रंगाची चादर जाळल्याचे काही छायाचित्र विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केले.
- रात्री सात वाजता विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर नारेबाजी केली.
- रात्री ७.३० वाजता पोलिसांनी त्यांना आंदोलन बंद करण्यास भाग पाडले.
- रात्री आठ वाजता चिटणीस पार्क चौकाकडून एक गट आला. त्यांनी हिरव्या चादरीबाबत आक्षेप घेतला. त्यानंतर पोलिसांनी संपूर्ण परिसराला घेराव करीत पोलिसांचा मोठा ताफा तैनात केला.
- रात्री साडेआठ वाजता दोन्ही धार्मिक गटांनी एकमेकांच्या विरोधात नारेबाजी केली. त्यामुळे वाद चिघळला. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून दुकाने बंद करण्यास भाग पाडले.
- दुकाने बंद केल्यामुळे एकच गोंधळ उडाला. पोलिसांवर दगडफेक करण्यात आली. पोलिसांनी जमावावर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या गेल्या.
- दोन्ही गटातील युवकांनी दगडफेक करणे सुरु केले. काहींनी जाळपोळ केली.
- रात्री ८.४० पासून वाजतापासून दंगल उसळली.
- रात्री ९ वाजतापासून पोलिसांनी 'कोम्बींग ऑपरेशन' राबवून धरपकड सुरु.
- रात्री १० वाजतापर्यंत २० जण ताब्यात घेतले आणि धरपकड सुरुच आहे.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची औरंगजेबाशी तुलना केल्याचे विधान परिषदेत पडसाद

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची औरंगजेबाशी तुलना केल्याचे पडसाद सोमवारी विधान परिषदेत उमटले. हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याच्या मागणीसाठी सत्ताधारी सदस्य आक्रमक झाले. त्यांनी सभापतींच्या समोरील मोकळ्या जागेत येऊन घोषणाबाजी सुरू केल्यामुळे सभापतींनी दहा मिनिटांसाठी सभागृह तहकूब केले.

विधान परिषदेचे कामकाज सोमवारी सुरू झाल्यानंतर सपभापतींनी प्रश्नोत्तरे पुकारली. त्यानंतर प्रवीण दरेकर यांनी हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केल्याचा मुद्दा उपस्थित केला. दरेकर म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उत्तम प्रशासक आहेत. उत्तम पद्धतीने राज्याचा कारभार चालवत आहेत, असे असताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केली. औरंगजेब जसा क्रूर प्रशासक होता, त्याच्यासोबत फडणवीस यांची तुलना करण्याचे घाणेरडे कृत्य त्यांनी केले आहे. सपकाळ यांनी महाराष्ट्राचा अपमान केला आहे. हा देवेंद्र फडणवीस याचा व्यक्तिगत अपमान नाही तर मुख्यमंत्री म्हणून संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान केला आहे. त्यामुळे असे बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा मी निषेध करतो. या प्रकरणाची सभागृहाच्या सभापतींनी गंभीर दखल घेऊन कठोर कारवाई करावी. हर्षवर्धन सपकाळ यांना समज द्यावी. त्यांचे वक्तव्य तपासावे आणि हे वक्तव्य राज्याच्या मुख्यमंत्र्यांविषयी आणि सरकारविषयी असेल तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारभारावर टीका केली तर मराठी अस्मितेला ठेच कशी पोहचते, असा सवाल करीत त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विधानाचाही समाचार घेतला. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचा अपमान केल्यानंतर मराठी अस्मितेला ठेच पोहचत नाही का, कोरटकर, सोलापूरकर यांनी शिवाजी महाराजांचा अपमान केला त्यांच्यावर बावनकुळे का बोलत नाहीत.

## विद्यार्थीनींचा लैंगिक छळ, ५९ अश्लील व्हिडीओ; निनावी पत्रामुळे झाला पर्यवेक्षकाच्या अत्याचाराचा भांडाफोड

उत्तर प्रदेशच्या हाथरसमधील सेठ फूलचंद बागला (पीजी) महाविद्यालयातील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या महाविद्यालयातील पर्यवेक्षक पदावर काम करणाऱ्या रजनीश कुमार नामक नराधमाने अनेक विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. रजनीश कुमार भूगोल विभागाचा प्रमुख असल्याचे सांगितले जात आहे. एका निनावी पत्रामुळे या नराधमाचे कृत्य उघड झाले. यानंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कारासह विविध कलमांनुसार गुन्हे दाखल केले आहेत.

आरोपी रजनीश कुमारने केलेल्या लैंगिक छळाचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यामुळे संपूर्ण उत्तर प्रदेशमध्ये खळबळ उडाली आहे. सदर घटना उजेडात आल्यानंतर महाविद्यालय प्रशासनाने पर्यवेक्षक रजनीश कुमारला निलंबित केले आहे.

जिल्हा प्रशासनानेही या विकृत प्रकाराची नोंद घेतली असून जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांना कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच चार सदस्यांची समिती स्थापन करून सात दिवसांत तपास करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

आरोपी रजनीश कुमार सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. एका पीडित विद्यार्थीनीने एका वृत्तवाहिनीला निनावी पत्र लिहिल्यानंतर हे प्रकरण उघड झाले.

### निनावी पत्रात काय म्हटले?

एनडीटीव्हीने दिलेल्या बातमीनुसार त्यांना एका पीडितेने निनावी पत्र लिहिले आहे. ज्यामध्ये नराधन रजनीश कुमारच्या अत्याचाराचा पाढा वाचण्यात आला. या पत्रासह एक पेनड्राईव्हही पाठविण्यात आला आहे. ज्यामध्ये ५९ अश्लील व्हिडीओ असल्याचा दावा एनडीटीव्हीने केला आहे.

**असा करायचा शोषण**

महाविद्यालयातील विद्यार्थीनींना चांगले गुण मिळवून देणे आणि सरकारी नोकरी मि ळवून देण्याचे आमिष दाखवून रजनीश कुमार त्यांना आपल्या जाळ्यात ओढत असे. त्यानंतर नराधम विद्यार्थीनींना बोलावून त्यांचे लैंगिक शोषण करतानाचे व्हिडीओ चित्रीकरण करत असे.

यानंतर हेच व्हिडीओ दाखवून तो त्यांच्यावर पुन्हा पुन्हा अत्याचार करत असे. व्हिडीओ चित्रीत केल्यामुळे विद्यार्थीनीही त्याच्याविरोधात तक्रार करण्यास धजावत नसत.

## वधूचे लग्नाच्या तिसऱ्या दिवशी दागिन्यांसह पलायन

**जळगाव :** जळगावात एका तरुणाचे लग्न एजंटच्या मध्यस्थीने ठरवण्यात आले, मात्र नववधूने लग्नाच्या तिसऱ्याच दिवशी ८४ हजार रुपयांचे दागिने घेऊन घरातून पसार होत वरपक्षाची तब्बल २.४४ लाख रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार १४ ते २३ फेब्रुवारी दरम्यान घडला असून, एमआयडीसी पोलीस ठाण्यात वधूसह एजंट आणि इतर दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामेश्वर कॉलनीतील २७ वर्षीय रिक्षाचालक तरुण कुटुंबासह राहतो. बराच काळ वधू न मिळाल्याने त्याच्या आईने बऱ्हाणपूर येथील एजंट आशाबाई हिच्याशी संपर्क साधला. आशाबाईने पूजा गंगाराम गावडे (रा. पिपरी महेपाल, जि. यवतमाळ) ही मुलगी दाखवली आणि एकूण १.६० लाख रुपयांचा व्यवहार ठरला. १८ फेब्रुवारी रोजी एजंट आशाबाई, वधू पूजा गावडे, तिची आई निर्मलाबाई डोंगरे, मावसा शिवशंकर आणि मामा गोपाळ खंडारे हे तरुणाच्या घरी आले. दुसऱ्याच दिवशी १९ फेब्रुवारी रोजी तातडीने लग्न लावून देण्यात आले. पैसे मिळताच एजंट आणि वधूचे नातेवाईक लग्नमंडपातून निघून गेले.



भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीने महाराष्ट्रात होणाऱ्या विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी अधिकृत उमेदवार म्हणून निवड झाल्यावर भाजपा प्रदेश महामंत्री श्री संजयजी केनेकर यांनी आज विधानसभेत नामांकन अर्ज दाखल केला.

## कापूस खरेदी केंद्राकडूनच शेतकऱ्यांची पिळवणूक, पणनमंत्र्यांची विधिमंडळात कबुली

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात कापूस खरेदीसाठी राष्ट्रीय कापूस महामंडळाकडून(सीसीआय) राज्यात सुरू करण्यात आलेली खरेदी केंद्र आणि व्यापारी यांच्याकडूनच कापूस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याची कबुली पणनमंत्री जयकुमार रावळ यांनी सोमवारी विधानसभेत दिली.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यासाठी सीसीआयची कापूस खरेदी केंद्र सुरू ठेवण्याबाबत अमित झनक, रोहित पवार, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, हरिष पिंपळे आदी सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेदरम्यान रावळ बोलत होते. राज्यात राष्ट्रीय कापूस महामंडळाची १ ऑक्टोबरपासून कापूस खरेदी केंद्र सुरू आहेत. दरवर्षी साधारणत: ११० कापूस खरेदी केंद्र असतात, मात्र यंदा १२४ केंद्रांवरून आतापर्यंत १० हजार कोटींचा १४२.६९ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे. मात्र या खरेदी प्रक्रियेत जिनिंग मिल्स आणि सीसीआय केंद्र संगनमताने शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. चांगला कापूस व्यापाऱ्यांना तर कमी प्रतीचा कापूस सीसीआय खरेदी करते. मध्यंतरी सीसीआयची कापूस खरेदीची ऑनलाइन प्रणालीच हॅक करण्यात आल्यामुळे पंधरा दिवस ही केंद्रे बंद होती, त्यामुळे अजूनही ज्या शेतकऱ्यांचा कापूस शिल्लक राहिला असेल तो खरेदी करण्यासाठी सीसीआयला विनंती करणार असल्याचे रावळ यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्याच्या कापूस खरेदी योजनेत अनेक त्रुटी असून पुढील हंगामापूर्वी या त्रुटी दूर केल्या जातील. त्यानुसार या योजनेत पारदर्शकता आणण्यात येणार असून त्यासाठी लवकरच आमदारांची बैठक घेणार असल्याचेही रावळ यांनी सांगितले.

## कबरीवरून राजकारण

संभाजीनगरपासून काही अंतरावर खुलताबाद येथे असणाऱ्या औरंगजेबाच्या कबरीवरून पुन्हा एकदा वातावरण तापले आहे. गेल्या महिन्यात १४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालेल्या छत्रपती संभाजी महाराजांवरील 'छावा' चित्रपटानंतर हा वाद पुन्हा चर्चेत आला आहे. समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब हा उत्तम शासक होता, असे विधान केल्यामुळे हा वाद आणखी चिघळला आहे. भाजपचे साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर उखडून टाका, अशी मागणी केल्यामुळे या वादामध्ये आणखीन तेल ओतण्याचे काम केले आहे. उदयनराजे यांच्या वक्तव्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता त्यांनी देखील कबर उखडून टाकावी, असेच वाटत असल्याचे स्पष्ट केले. मात्र, काही गोष्टी कायद्याने कराव्या लागतील, असे सांगत सावध प्रतिक्रिया दिली होती. काँग्रेसच्या राजवटीमध्ये या कबरीला 'एएसआय'चे संरक्षण मिळालेले आहे. त्यानंतर हा मुद्दा संसदेतही गाजला होता. शिंदेसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी हिंदूंची अनेक मंदिरे पाडणाऱ्या तसेच शिखांच्या नवव्या आणि दहाव्या धर्मगुरूंची हत्या करणाऱ्या, क्रूर पद्धतीने छत्रपती संभाजी महाराजांचा छळ करणाऱ्या औरंगजेबाबाबत सवाल उपस्थित केला होता. केवळ औरंगजेबच नव्हे तर भारताविरोधी काम करणाऱ्या सर्वांचीच स्मारके आणि कबरी नष्ट करण्याची मागणी म्हस्के यांनी संसदेत केली होती.

दरम्यान, बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेनेदेखील शनिवारी महाराष्ट्रातून औरंगजेबाची कबर हटवण्यात यावी, अशी मागणी केली आहे. सरकारने जर ही कबर हटवली नाही तर कारसेवा करून ती हटवण्याचा इशाराही विहिंपने दिला आहे. उबाठा गटाचे संजय राऊत यांनी बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या मुद्द्याकडे सर्वप्रथम लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत बेरोजगार मुलांच्या डोक्यात धर्मांधता भरवण्याचे काम केले जात असल्याचा आरोप केला आहे.

काँग्रेसचे नूतन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी औरंगजेब आणि फडणवीस यांचा कारभार सारखाच असल्याचे वक्तव्य करून वातावरण आणखी तापवले आहे. औरंगजेब क्रूर शासक होता आणि धर्माचा आधार घेणारे फडणवीस हेदेखील क्रूरशासक असल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे. गेले दहा दिवस या विषयावर उलटसुलट प्रतिक्रिया येत आहेत.

औरंगजेबाच्या कबरीचा वाद नेमका कोणत्या वळणावर जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'गँग्स ऑफ वासेपूर' या चित्रपटासारखी परिस्थिती महाराष्ट्रातील सध्याचे राजकारण पाहता दिसून येत आहे. मानापमान आणि अहंकाराच्या या खेळाची किंमत राज्यातील सर्वसामान्य जनतेला निश्चितच चुकवावी लागणार आहे. त्यामुळे सर्वांनीच डोकी शांत ठेवून राज्य पुढे नेण्यासाठी सर्वधर्मसमभावाची भूमिका घ्यायला हवी.

## फेब्रुवारीत घाऊक महागाई २.३८ टक्क्यांपर्यंत वाढली

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

देशात फेब्रुवारी महिन्यात घाऊक महागाई २.३८ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. जानेवारीच्या सुरुवातीला घाऊक महागाई दर २.३१ टक्के होता. अन्न उत्पादनांच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे महागाई वाढली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने आज, सोमवारी ही आकडेवारी जाहीर केली.

सरकारच्या आकडेवारीनुसार दैनंदिन वापराच्या वस्तूंमधील महागाई ४.६९ वरून २.८१ टक्क्यांपर्यंत कमी झाली. अन्नधान्यांमधील महागाई ७.४७ टक्क्यांवरून ५.९४ टक्क्यांपर्यंत कमी झाली. इंधन आणि विजेचा घाऊक महागाई दर २.७८ टक्क्यांवरून -०.७१ टक्क्यांपर्यंत वाढला. अन्न उत्पादन उत्पादनांचा घाऊक महागाई दर २.५१ टक्क्यांवरून २.८६ टक्क्यांपर्यंत वाढला. धान्याचा घाऊक महागाई दर ७.३३ टक्क्यांवरून ६.७७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. डाळींच्या घाऊक किमतीतील महागाई ५.०८ टक्क्यांवरून -१.०४ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. तर भाजीपाल्याचा महागाई दर ८.३५ टक्क्यांवरून -५.८० टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे.

दुधाचा घाऊक महागाई दर २.६९ टक्क्यांवरून १.५८ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. घाऊक महागाईत दीर्घकाळ वाढ झाल्याने बहुतेक उत्पादक क्षेत्रांवर प्रतिकूल परिणाम होतो. जर घाऊक किमती दीर्घकाळ जास्त राहिल्या तर उत्पादक त्याचा भार ग्राहकांवर टाकतात. सरकार फक्त करांच्या माध्यमातूनच घाऊक किंमत निर्देशांक नियंत्रित करू शकते.

कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली होती, त्याप्रमाणे सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्क कमी केले होते. तथापि, सरकार केवळ एका मर्यादेतच कर कपात कमी करू शकते. धातू, रसायने, प्लास्टिक आणि रबर यासारख्या कारखान्याशी संबंधित वस्तूंना घाऊक किंमत निर्देशांकामध्ये जास्त महत्त्व असते.

# स्मार्ट मीटरचा नागरीकांना भुर्दंड; मुख्यमंत्र्यांनी जनहितार्थ निर्णय बदलावा- डॉ.राजेंद्र दाते पाटील यांची मागणी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पाच वर्षांत वीज दर २४ टक्के घटणार असल्याचे मुख्यमंत्री सांगतात पण स्मार्ट मीटरचा नागरीकांना मोठा भुर्दंड पडणार असल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी जनहितार्थ तो निर्णय बदलावा अशी मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव व शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.



त्यांनी या पूर्वीच राज्य शासनाकडे मागणी केली होती की,पोस्टपेड विद्युत मीटर जोडणी त्वरीत बंद करावी स्मार्ट प्रीपेड मीटरला संपूर्ण तीव्र नकार व सध्याचे पोस्टपेड मीटर व जोडणी आहे तशीच चालू ठेवावी व पोस्ट पेड विद्युत मीटर जोडणी तात्काळ बंद करावी अशी लेखी मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केलेली आहे. त्यांनी नमुद केले होते की, महावितरण कंपनीने राज्या तील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावणार असे जाहीर केले होते तसेच हे मीटर्स कंपनीच्या खर्चाने मोफत लावणार अशी फसवी व चुकीची जाहिरात केली आहे.हे मीटर नागरीकांना भविष्यात अनेक आर्थिक अडचणीत टाकणारे ठरणार असल्या मुळें ते लावण्यास आमचा तीव्र विरोध आहे.या संबंधातील टेंडर्स मंजूर करण्यात आलेली आहेत व लवकरच सर्वत्र मीटर्स लावण्याची मोहीम सुरू होईल असे स्पष्ट दिसून येत आहे. पुढे आपल्या सविस्तर निवेदनात अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील म्हणतात की,वास्तविक हे मीटर्स मोफत लावले जाणार नाहीत. केंद्र सरकारचे अनुदान वगळता या मीटर्सचा उर्वरित सर्व खर्च वीजदर निश्चिती याचीके द्वारे आयोगाकडे मागणी केला जाईल व आयोगाच्या आदेशा नुसार बीजदरवाढीच्या रुपाने १ एप्रिल २०२५ पासून ग्राहकांच्या खिशातूनच वसूल केला जाईल हे निश्चित व स्पष्ट आहे. त्यामुळे केवळ महावितरण कंपनी वा येणाऱ्या खाजगी वितरण कंपन्या वा सरकार यांच्या हितासाठी व खाजगीकरणाच्या वाटचाली तील पुढचा टप्पा म्हणनूच ही योजना आणलेली आहे असे स्पष्ट दिसून येत आहे.त्यामुळे या स्मार्ट म्हणवल्या जाणाऱ्या प्रीपेड मीटर्सना संपूर्ण पणे राज्यभरात जनतेचा विरोध आहे म्हणून विनंती की, वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७ (५) अन्वये कोणते मीटर वापरायचा याचे स्वातंत्र्य व मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क संबंधित ग्राहकांना आहेत. कंपनी अघोषित सक्ती करून ग्राहकांच्या या हक्काचे व कायदेशीर तरतुदींचे संपूर्णपणे उल्लंघन करीत आहे, हे राज्यातील तमाम जनतेस अजीबात मान्य नाही. त्यामुळे ग्राहक म्हणून हक्का नुसार राज्य भरातील सध्याचाआहे तोच मीटर पुढेही कायम ठेवण्यात यावा अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे केली होती. पुढे अत्यंत विस्ताराने तांत्रीक बाजु त्यांनी नमुद करुन महावितरण कंपनीने मंजूर केलेल्या टेंडर्सनुसार मीटर्सचा खर्च १२०००/- रु. प्रति मीटर या प्रमाणे आहे.प्रीपेड मीटर साठी केंद्र सरकारचे प्रति मीटर ९००/- रु. अनुदान वगळता प्रत्येक ग्राहका मागे किमान ११९००/- रु. प्रति मीटर खर्च कर्ज काढून केला जाणार आहे.या कर्जास राज्यभरातील सर्वसामान्य जनतेची मान्यता तर नाहीच नाही परंतु सदरचे मीटर एक ही ग्राहक लाऊन घेणार नाही आणि पर्यायाने असा कुठलाही खर्च जनते वर लादता येणार नाही. या खर्चा मुळे या कर्जावरील व्याज, घसारा,संबंधित खर्च व इतर कारणासाठी वीजदरा मध्ये वाढ होणार आहे हे निश्चीत आहे. ही वाढ अंदाजे किमान ३० पैसे प्रति युनिट व अधिक होईल त्या साठी छुपा स्लॅब तयार होऊन प्रचंड असे मोठे आर्थिक संकट या मुळे राज्य भरातील ग्राहका समोर उभे राहणार असून प्राप्त हक्क व अधिकारा नुसार मुळात असे किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या मीटर शिवाय कुठले ही इतर मीटर वापर राज्यांतील जनता वापरत नसल्यामुळे या वाढीव दराचा कोणताही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बोजा जनतेवर मनमानी पद्धतीने लावता येणार नाही याची राज्य शासनाने नोंद घेणे गरजेचे असुन याबाबत असे कुठलेही मीटर लावु नये व तशी पुढील कार्यवाही अति तातडीने करावी ही विनंती करण्यात येउन सक्तीने असे मीटर लावण्याचा प्रयत्न केल्यास अशा सक्तीच्या जोडणीला प्रखर नागरी विरोध होईल याची कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी अशी विनंती अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.

### स्मार्ट मीटरचा भुर्दंड ज्ञात असताना देखील मुख्यमंत्र्यांचा हा अट्टाहास कोणासाठी

राज्यपालांच्या अभिभाषणाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील ७० टक्के घरगुती ग्राहक म्हणजे सुमारे १.५ कोटी कुटुंबे हे दरमहा ० ते १०० युनिट वीज वापरतात त्यांच्यासाठी नवीन योजना आणली जाईल हे म्हणणे अयोग्य असुन १००पेक्षाही जास्त युनिट वापर होत आहे. जर या योजनेअंतर्गत ३०० युनिट पर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळणार असेल तर नियोजन १०० युनिट पर्यंतच का बरे करत आहात ? हा सवाल देखील अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला असुन जादा वीज निर्मिती केल्यास ती सरकार खरेदी करेल. त्यामुळे ग्राहकांना वीज बिलाच्या चिंतेतून मुक्ती मिळेल. सरकारने बहुवार्षिक वीज दर याचिका सादर करत वीज दरात कपातीचा निर्णय घेतला. जी वीज ८ रुपयांना पडत होती ती केवळ ३ रुपयांना पडणार आहे, युनिटमागे ५ रुपये आपण वाचवत आहोत असे म्हणणे खरे असेल तर मग स्मार्ट मीटरचा भुर्दंड ज्ञात असताना देखील मुख्यमंत्र्यांचा हा अटटा हास कोणासाठी आहे ?- असा सवाल देखील अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला असुन जनहितार्थ राज्य शासन आणि मुख्यमंत्र्यांनी स्मार्ट मीटरचा अट्टाहास रद्द करून सर्व सामान्य जनतेस न्याय द्यावा अशी मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.

# लाडकी बहीण योजना निकष बदलून सुरू ठेवणार-अजित पवार

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गेल्या १० वर्षांत राज्याचा अर्थसंकल्प हा महसुली आणि राजकोषीय तुटीचा म्हणूनचा सादर झालेला आहे.तरीही महाराष्ट्राची आर्थिक शिस्त पाळण्याची आपली परंपरा आहे. महसुली तूट कमी करण्यासाठी दोन पर्याय असतात. एक उत्पन्नात वाढ करणे आणि दुसरा अनुत्पादक खर्चात कपात करणे. उत्पन्नात वाढ करण्याचे प्रयत्न केले तर गरिबांचा खिसा कापल्याचे ओरड होते. त्यामुळे उत्पन्न वाढीला मर्यादा येते. तथापि राज्य सरकारच्या लोकप्रिय अशा लाडक्या बहिणी योजनेचे निकष काही प्रमाणात बदलून ही योजना यापुढेही सुरूच ठेवण्यात येणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना दिली. सरकारी खर्चावर नियंत्रण ठेवून महसुली तूट कमी करण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अजित पवार यांनी राज्याचा सन २०२५-२६ या वर्षीचा अर्थसंकल्प १० मार्चला सादर केला होता. या अर्थसंकल्पावर गेल्या आठवड्यात सर्वसाधारण चर्चा झाली.या चर्चेला उत्तर देताना अजित पवार यांनी आपल्या भाषणात विरोधी पक्षाच्या टीकेचा समाचार घेतला. राज्याची महसुली तूट, राजकोषीय तूट, राज्यावरील कर्जाचा बोजा आदी आक्षेपांना उत्तर देताना पवार यांनी राज्याची अर्थव्यवस्था चिंताजनक असल्याच्या आरोपाचे खंडन केले. राज्याचा अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढल्यानंतर कर उत्पन्न वाढून राज्याची अर्थव्यवस्था मजबूत होईल, असा दावा पवार यांनी केला.

सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ४५ हजार कोटी महसुली तूट दाखविण्यात आलो असली तरीही वित्तीय वर्ष संपल्यानंतर प्रत्यक्ष खर्च विचारात घेतला तर त्या वेळेस अशी तूट मोठ्या प्रमाणावर कमी झालेली असते किंवा तूटीच्या ऐवजी अधिक्य आल्याचे स्पष्ट होते. कर चुकवेगिरीला आळा घालण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलली आहेत. पूर्वी कर चुकविणाऱ्याला अटक करण्याची तरतूद नव्हती. आता कायद्यात अटकेची तरतूद केल्याने त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आलेला आहे. मुद्रांक आणि नोंदणी फी, राज्य उत्पादन शुल्क, राज्य वस्तू आणि सेवा कर यात ५ ते १९ हजार कोटीची वाढ अपेक्षित आहे. माझ्या अनुभवानुसार वर्षअखेरपर्यंत याहीपेक्षा मोठी वाढ दिसून येईल आणि तूट कमी होईल, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. पवार यांनी आपल्या भाषणात राज्यावर असलेल्या कर्जाबाबतही माहिती दिली. मार्च २०२५ अखेरीस राज्यावर ७ लाख ८२ हजार ९९१ कोटी इतके कर्ज अंदाजित आहे. गेल्या १५ वर्षातील स्थूल राज्य उत्पन्न आणि एकूण कर्ज यांची आकडेवारी पाहता स्थूल उत्पन्न वाढत गेले असून साधारणत: त्या प्रमाणात एकूण कर्जही वाढले आहे. २०२५-२६ मध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न ४९ लाख ३९ हजार ३०५ कोटी अंदाजित असून कर्ज ९ लाख ३२ हजार २४२ कोटी म्हणजेच स्थूल उत्पन्नाच्या १८. ८७ टक्के अंदाजित आहे. आपण २५ टक्यांपर्यंत कर्ज घेऊ शकतो. सध्याचे कर्ज सुरक्षित मर्यादेच्या आत आहे. त्यामुळे राज्याच्या कर्जाबाबत चुकीचा समज पसरवणे योग्य नाही. राज्याच्या आर्थिक स्थितीच्या बाबतीत निराधार आरोप करुन राज्याची आर्थिक परिस्थिती खालावल्याचे खोटे चित्र रंगवू नका, असेही पवार यांनी विरोधकांना सुनावले.

**गरज संपलेल्या योजना बंद करणार**

राज्याच्या आणि विविध समाज घटकांच्या हिताच्या योजना बंद करणार नाही. पण गरज संपलेल्या, द्विरुक्ती असलेल्या योजना सरकार बंद करेल. कोविड काळात सुरु केलेल्या योजना कोविड संपल्यानंतर बंद करण्यात आल्या.

डबल खर्च नको आणि राज्याचा खर्च वाचावा म्हणून आपण काही योजना बंद करतो. त्यामुळे गैरसमज पसरू नका. लाडकी बहिण योजना सुरू ठेवताना त्यात दुरुस्ती करण्याची सरकारची भूमिका आहे. दुरुस्ती करताना गरीब महिलांना फायदे मिळत राहतील. निवडणुकीच्या वेळी केलेल्या घोषणेनुसार पैसे दिले जातील. अद्यापही पाच वर्षांचा कालावधी आहे. ही योजना आम्ही बंद करणार नाही. मात्र, ही योजना गरीब घटकांतील महिलांसाठी असून ती केवळ आर्थिक साहाय्यासाठी न ठेवता, यातून महिलांचे सबळीकरण केले जाईल, असेही अजित पवार यांनी सांगितले.

### विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत

# हिंदू नववर्ष स्वागतासाठी मंदिरांनी पुढाकार घ्यावा, कुंभातील गंगाजलाचा तीन अपरिचित मंदिरात जलाभिषेक करावा, रामोत्सव साजरा करावा - राजीव जहागिरदार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हिंदू नवीन वर्ष गुढीपाडव्यापासून म्हणजेच ३० मार्चपासून २० एप्रिल पर्यंत तीन अभियानांचे आयोजन विश्व हिंदू परिषदेने केले आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी दिनांक ३० मार्चला प्रत्येक मंदिराने पुढाकार घेऊन हिंदू नववर्षाचे स्वागत करावे. गुढीपाडवा ते हनुमान जयंती या काळात समाजात विविध पद्धतीने रामोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करावा तसेच गुढीपाडवा ते २० एप्रिल या काळामध्ये तीन अपरिचित मंदिरांचे दर्शन घेऊन मूर्तीवर तेथे कुंभातील गंगाजलाने जलाभिषेक करावा. या तिन्ही कार्यक्रमात हिंदू समाजाने, तसेच वेगवेगळ्या धार्मिक संस्था, संघटना, मंदिरे, संत, धर्माचार्य, पुरोहित, पुजारी, विश्वस्त, भाविक यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेने केले आहे.

हिंदू नववर्ष स्वागतासाठी मंदिरांनी पुढाकार घ्यावा- सध्या आमचे हिंदू नववर्ष ५१२६ सुरू आहे. येत्या चैत्रशुद्ध प्रतिपदे पासून नवीन वर्ष सुरू होईल ते राहील ५१२७ आमची प्राचीन शास्त्रीय हिंदू कालगणना पुन्हा प्रस्थापित व्हावी. याकरिता आमचे हिंदूंचे, नवीन वर्ष एक जानेवारी नाही तर चैत्र शुद्ध प्रतिपदा पासून सुरू होते. या नववर्ष स्वागताचे धार्मिक क्षेत्रातील नेतृत्व मंदिरांनी करावे ही समाजाची स्वाभाविक अपेक्षा आहे. त्या दृष्टीने मंदिरांनी आपल्या वस्तीत, यासाठी पुढाकार घेऊन त्याची योजना करावी.



मंदिरांसाठी किमान कार्यक्रम- १) मंदिरांनी आपल्या शक्तीनुसार हिंदू घरांवर लावण्यासाठी भक्तांना किमान शंभर, पाचशे, हजार भगवे ध्वज वाटप करणे.

२) प्रत्येक मंदिरावर किमान दोन मीटर भगवा ध्वज लावावा तत्पूर्वी

या ध्वजाचे पूजन आसपासच्या विविध समाजातील ११ किंवा २१ तरुण जोडप्यांच्या हस्ते व्हावे.

३) गुढीपाडव्याच्या दिवशी मंदिर परिसरात नवीन वर्ष स्वागत शोभायात्रा काढावी. किंवा जाहीर कार्यक्रम करावा.

४) आपल्या मंदिर परिसरातील अतिशय गरीब, मजूर, मागास अशांसाठी मिठाईवाटप, कपडे वाटप, असा काही ना काही त्यांना समर्थ करणारा सेवा कार्यक्रम करावा.

**अपरिचित मंदिर दर्शन अभियान-** हिंदू समाजाला प्रामुख्याने नवीन पिढीला मंदिरांशी घट्ट पुन्हा जोडणे.मंदिरांविषयी जनजागृती, मंदिर विचाराच्या/ जीवनाच्या केंद्रस्थानी आणणे आणि या निमित्ताने मंदिरांची मंदिर गणना, पुजारी गणना हे तीन उद्देश या अभियानाच्या मागे आहेत. गुढीपाडवा ३० मार्च ते भानू सप्तमी २० एप्रिल २०२५ हा अभियानाचा २० दिवसांचा काळ आहे . यात सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने आपल्या परिसरातील तालुक्यातील किंवा जिल्ह्यातील किमान तीन अपरिचित मंदिरांना भेट द्यावी. देवगिरी प्रांतात या काळात एक लाख वेगळ्या अपरिचित मंदिरापर्यंत हिंदू युवा वर्ग पोहोचेल. कुंभाहून आणलेल्या पवित्र गंगाजलाचा मूर्तीवर जलाभिषेक करतील.

**कोणत्या मंदिरांना भेट द्यावी-** ज्या मंदिरात आपण आधी गेलेलो नाही, भेट दिलेली नाही, दर्शन घेतलेले नाही, असे आपल्या गावातील, तालुक्यातील जिल्ह्यातील अपरिचित मंदिर. सेवा वस्तीतील मंदिरे, तसेच संवेदनशील वस्तीत (जिथे हिंदु कमी आहे व गैर हिंदु वाढले आहेत) टिकून असलेली मंदिरे.

**मंदिर दर्शनाच्या वेळी काय करावे -** कुभांहून आणलेल्या पवित्र गंगाजलाचा तेथील मूर्तीवर जलाभिषेक करावा,स्थानिक पुजारी किंवा मंदिराची देखभाल करणाऱ्यांचे अभिनंदन करावे. हे मंदिर ज्या आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी उभारलं, टिकवलं, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी. मंदिर माहिती व पुजारी माहिती संकलन करावे. आपल्या दर्शनाची माहिती सोशल मीडियावर फोटोसह आवश्य पोस्ट करावी आणि या उपक्रमात सहभागी होण्याचे सर्वांना आवाहन करावे. स्पर्धा -मंदिर भेटीवरील १) लेख, २) फोटो आणि ३) व्हिडिओ या वर्गवारीत स्पर्धांचे आयोजन केले आहे. मंदिरांनी या दरम्यान काय करावे- मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भाविकांला टिळा लावावा. प्रसाद द्यावा.त्यांची आस्थेने चौकशी करावी. त्यांना मंदिरांची माहिती द्यावी. दिनांक ३० एप्रिल ते हनुमान जयंती रामोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करावा. चैत्र शुक्ल. प्रतिपदा दि. ३० मार्चपासून हनुमान जयंती १२ एप्रिलपर्यंत या कालावधीत सर्वत्र रामोत्सवाचे कार्यक्रम व्हावे. या कालावधीत वस्ती वस्तीमध्ये प्रभू रामाची प्रतिमा समोर ठेवून राम जन्मभूमी आंदोलनाचा इतिहास सांगावा हनुमान चालीसा घ्यावी शेवटी प्रभू श्री रामाची आरती व्हावी या कालावधीत संतांची प्रवचने आणि आशीर्वाद असावेत.

यावेळी प्रभू श्री राम यांच्या जीवनकथेचा संदर्भ देत समरसता आणि कौटुंबिक प्रबोधन हा विषय ठेवावा.अतिथी म्हणून अनुसूचित जातीतील किंवा जमातीतील भाविकाना बोलवावे. या तीनही उपक्रमात हिंदू बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येत सहभागी व्हावे असे आवाहन विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत मंत्री श्री योगेश्वरजी गर्गे प्रांत सहमंत्री काशिनाथ दाबके मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार महानगर अध्यक्ष डॉ. सुशील भारुका, महानगर मंत्री अभिषेक कादी अनुराधा पुराणिक गोपाळ मालपाणी यांनी केले आहे

## मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विदेशातील शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना; अर्ज मागविले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दरवर्षी अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विशेष अध्ययन करण्यासाठी विदेशात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून विदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्तीकरीता अर्ज मागविण्यात आले आहेत. हे अर्ज ऑनलाईन सादर करण्याची सुविधा असून त्याची प्रत पोस्टाने किंवा समक्ष समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड पुणे ४११००१ येथे सादर करावा,असे प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण जयश्री सोनकवडे यांनी कळविले आहे.

**योजनेचा उद्देश:-** अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुला - मुलींना परदेशात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पी.एच.डी) विशेष अध्यन करण्यासाठी आर्थिक मदत देणे.

योजनेची व्याप्ती:- महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पदव्युत्तर पदवी आणि पी.एच.डी साठी अद्ययावत QS World University Ranking 200 च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल. परदेशातील विद्यापीठ / शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा. तसेच विद्यार्थ्यांकडे जात पडताळणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**उत्पन्न मर्यादा:-** या योजनेतंर्गत लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या कटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे कुटुंबातील सर्व सदस्यांचे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न आठ लक्ष रुपयांपेक्षा अधिक नसावे.

शैक्षणिक अर्हता:- परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्यूत्तर पदविका अभयासक्रम ासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५% गुणांसहीत पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख:- htt{s://fs.maharashtra.gov.in या वेबसाईटवर विहित नमुन्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज, वाचनीय व सुस्पष्ट कागदपत्रे ऑनलाईन सादर करुन त्याची सुस्पष्ट प्रिंट, ऑफलाईन नमून्यातील अर्जासोबत समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयास सादर करावी.

अर्ज दि. ३० एप्रिल सायंकाळी सव्वा सहा वाजेपर्यंत स्विकारला जाईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करावा,असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त सम ाजकल्याण जयश्री सोनकवडे यांनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजसेवा करणाऱ्याचा गुण गौरव सोहळा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्यातील विविध ठिकाणी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून सामाजिक बांधिलकी जपत सेवा करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा यथोचित सन्मान राज्यस्तरीय पुरस्कार देऊन माणुसकीचे नाते जपणाऱ्या सु-लक्ष्मी बहुउद्धेशिय सेवा भावी संस्थेच्या वतीने त्यांच्या माणुसकीच्या कार्याच्या आठव्या वर्धापन दिन व राम सुमित पंडित यांच्या सातव्या वाढदिवस निमित्त आयोजित कार्यक्रमात शनिवार(ता,१५)रोजी येथील मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात शाल, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारार्थींचा यथोचित सत्कार करण्यात आला.



प्रथम स्वच्छतादूत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी व्यासपीठावर त्रिपुरा विद्यापीठाचे कुलुगुरु प्रा. प्रकाश करमाडकर, वडोद बाजार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील इंगळे, चिकलठाणा पोलीस स्टेशनचे स.पो.नि.संजय खंडागळे, वेदांतनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक,व प्रसिद्ध खंजिरी वादक पंकज राठोड, हभप विजय गवळी, प्रसिद्ध उद्योजक मनोज कदम, हभप श्याम महाराज, सुनील कोटकर, सी.ए.काटकर, शरद सोनवणे, जालना मनपाच्या उपायुक्त नंदा गायकवाड व जेष्ठ साहित्यिक व समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्रा. सोनवणे यांनी केले ते म्हणाले की, या संस्थेचे सर्वे सर्वा सुमित पंडित व पूजा पंडित हे दोघेही पती पत्नी सामाजिक कार्याचा वसा घेऊन समाज सेवा करीत आहेत, ज्यांना कुणाचाही आधार नाही, त्यांना आधार देणे, या शिवाय माणुसकी वृद्ध सेवालय मार्फत दीन, दुबळे,व निराधाराना आश्रय देऊन त्यांची सेवा करणे,जलसुरक्षा, मुली जन्माचे स्वागत,अन्नदान शिबीर,'बेटी बचाओ-बेटी पढाओ' प्रबोधन, संत श्रेष्ठ गाडगेबाबा यांचा स्वच्छता संदेश, जुन्या अनिष्ट रूढी, परंपरा त्यागणे, व्यसन व विकारांच्या दुष्परिणाम चे प्रबोधन करणे, अंधश्रद्धा निर्मूलन अशी विविध कामे आपल्या पत्नी पूजाला सोबत घेऊन मित्र परिवाराच्या वतीने करीत आहेत.तसेच राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींचा गौरव इत्यादी कार्य करीत आहेत, असे सोनवणे यांनी प्रास्ताविकात विशद केले. उपस्थितांनी सुमित व पूजा पंडित यांच्या या कार्याचा गौरव केला.

उपस्थिताना जागेवर खिळवून ठेवणारे सूत्र संचलन श्री कांबळे यांनी केले तर आभार सुमित पंडित यांनी मानले.पुरस्कारर्थीत माझा मराठवाडा चे संपादक दशरथ सुरडकर, पोनि, सुनील इंगळे, संजय खंडागळे, श्री ,शिंदे,श्रीमती मनीषा घोडे या सारख्या मान्यवरांचा समावेश होता.शेवटी सामूहिक राष्ट्रगीताने कार्यकर्माची सांगता झाली.

## तणावमुक्त जीवनासाठी दोन दिवसीय विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत तणाव हा मोठ्या समस्यांपैकी एक बनला आहे. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत कोणीही यापासून सुटलेले नाही. मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर तणावाचा विपरीत परिणाम होत असल्यामुळे तणावमुक्त जीवनशैली विकसित करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, एन-२ सिडको, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने दोन दिवसीय विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २२ आणि २३ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ४:३० ते ८:०० या वेळेत हा कार्यक्रम दर्पण गार्डन, एन-२ (एमआयटी रुग्णालय जवळ) सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. गुजरातच्या भरूच येथून विशेष निमंत्रित मार्गदर्शक मा. मनोज कोतवाल हे या कार्यक्रमात तणावमुक्त आणि आनंदी जीवन, गोंधळापासून प्रकाशापर्यंत जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत. ध्यान, सकारात्मक विचारसरणी आणि मानसिक स्वास्थ्य वाढविण्याच्या प्रभावी तंत्रांची ओळख या सत्रांमध्ये करून दिली जाणार आहे.

या कार्यक्रमांमध्ये संगीत संध्याकाळ हे विशेष कार्यक्रम ठेवलेला आहे, आणि सर्वांसाठी खुला आणि मोफत आहे. त्यामुळे इच्छुक नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९४२०१७९२६२, ९४०५१७९२६२ वर संपर्क करावा, असे प्रसिद्धीप्रमुख अशोक गुरनाळे यांनी पत्रकाद्वारे कळिवले आहे.

## 'माणुसकीच्या' आठव्या वर्धापन दिन निमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

रक्तदान -श्रेष्ठदान हे तत्व पाळून व देशातील रूग्णांना रक्ताची नितांत गरज लक्षात घेऊन येथील 'माणुसकी' ग्रुपच्या आठव्या वर्धापन दिन निमित्त व चि. राम सुमित पंडित यांच्या सातव्या वाढदिवस निमित्त आयोजित रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी उस्फुर्त प्रतिसाद देऊन सामाजिक बांधिलकी जपत शनिवार(ता.१५)रोजी रक्तदान केले.

मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे सु-लक्ष्मी बहुउद्धेशिय सेवा भावी संस्था संभाजीनगर यांनी हे



शिबीर आयोजित केले होते. या रक्तदान शिबिराचे उदघाटन वैजापूरचे सामाजिक कार्यकर्ते व सु-लक्ष्मी बहुउद्धेशिय सेवा भावी संस्थेचे सल्लागार सदस्य ठा,धोंडीरामसिंह राजपूत यांनी स्वच्छतादूत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले व दीप प्रज्वलित करून उदघाटन केले. या प्रसंगी समाजकार्यकर्ते व संस्थेचे अध्यक्ष सुमित पंडित, पूजा पंडित, माझा मराठवाडाचे संपादक दशरथ सुरडकर, प्रति चार्ली चॅप्लिन सोमनाथ स्वभावाने, राम पंडित व श्री कांबळे, श्री. शिंदे, प्रा.श्री. सोनवणे यांची उपस्थिती होती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय(घाटी)च्या रक्त संकलन विभागाच्या प्रमुख डॉ. संगीता पेरके, डॉ. मेघा गंगेले, डॉ. प्रणाली राठी, सहायक अनुसया घोगरे, श्री. खान यांनी हे रक्त संकलन केले. रक्तदान शिबिरात प्रथम सुमित पंडित व सोमनाथ स्वभावाने यांनी रक्तदान केले.

## चला चला पाणी पिण्याची वेळ झाली; मुलांसाठी मनपा प्रियदर्शनी विद्यालयात वॉटर बेल उपक्रम सुरु

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सतत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. याच अनुषंगाने मां. आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत, उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे, आणि मुख्याध्यापक संजीव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली, मनपा प्रियदर्शनी विद्यालयात वॉटर बेल उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शाळेमध्ये लहान मुलं पाणी पिण्यास विसरतात किंवा अभ्यास व खेळणाऱ्या विषयांमध्ये रममाण असल्यामुळे पाणी प्यायला विसरतात हे टाळण्यासाठी महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय प्रियदर्शनी मयूरबन कॉलनी या शाळेमध्ये वॉटर बेल हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

यांतर्गत ठराविक वेळेनंतर म्हणजेच एक तासानंतर मुलांना बजावून पाणी प्या अशी सूचना दिली जाते. त्यावेळेस वर्गशिक्षक सुद्धा त्यांच्यासोबत पाणी पितात. मुलांच्या शरीरात पाण्याची कम



तरता असणे हे आजार होण्याचे मुख्य कारण आहे. आवश्यक तेवढे पाणी न पिल्याने तसेच आवश्यक पोषक तत्व न मिळल्याने आजार होण्याचा धोका निर्माण होतो. यासाठी मुलांना पाण्याच्या बॉटल सोबत ग्लुकोन डी किंवा सरबत ही मागवले जाते. मुले शाळेत येताना पाण्याची बॉटल सोबत आणतात. पण शाळेतून बरेचदा पाणी भरलेले बॉटल परत येत असते अशी पालकांची ही तक्रार असते. मुले शाळेत असली की पाणी पिण्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्यांना पाणी पिण्याचे आठवण करून देणे आवश्यक ठरते.ठराविक प्रमाणात नियमित पाणी प्यायले की आजारांना दूर ठेवता येते. आरोग्य ही चांगले राहते. त्यामुळे मुलांना पाणी पिण्याचे आठवण करून देणे तसेच त्यांना नियमित पाणी पिण्याची सवय लागावी यासाठी राज्यातील सर्व शाळांमध्ये वॉटर बेल उपक्रम राबवण्याचे शासनाने आदेश दिले होते. जिल्ह्यात सध्या उन्हाची तीव्रता वाढली आहे, विद्यार्थी दिवसभरातील जास्तीत जास्त वेळ शाळेत असल्याने पाण्याकडे दुर्लक्ष करतात, त्यामुळे डीहायड्रेशन होऊन विद्यार्थी आजारी पडतात. विद्यार्थ्यांनी ठराविक वेळेला पाणी प्यायला लावून तसेच सरबत किंवा ग्लुकॉन डी प्यायला लावून विविध आजारांपासून दूर ठेवू शकतो. जी मुले शाळेमध्ये ग्लुकॉन डी किंवा सरबत आणत नाहीत त्यांच्यासाठी एनर्जेल व ग्लुकॉन डी पावडर तयार ठेवलेली आहे. यासाठीचा हा उपक्रम सुरू केल्याचे मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी सांगितले.पाणी पिण्यासाठी वेळ निश्चित करण्याचे शासनाने वेळापत्रक तयार केले आहे. मुख्याध्यापक संजीव सोनार शिक्षक तेजस्विनी देसले, रश्मी होनमुटे, स्वाती डिडोरे, प्रतिभा गावंडे, बाबू राठोड, पूजा सोनवणे, शुभांगी जम धडे, सफा पठाण, मोनिका चव्हाण हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. त्यानुसार शाळेत पाणी पिण्याबाबत कार्यवाही केली जाते. विद्यार्थ्यांना स्वच्छ व थंड पाण्यासाठी वॉटर कूलर आहे. त्याचे फिल्टर दर महिन्याला स्वच्छ केले जाते. तसेच एनर्जेल,जठड उपलब्ध व्हावे यासाठी सर्व शिक्षकांनी शाळेमध्ये वरील साहित्य उपलब्ध करून घेतलेले आहे.

## कांशिरामजी यांच्या जयंती प्रित्यर्थ प्रबोधनाचा कार्यक्रम संपन्न



**१६ मार्च २०२५ ला वाडी (महाळुंगी) तालुका नांदुरा जिल्हा बुलढाणा येथे बहुजन समाज रत्न मान्यवर साहेब कांशिरामजी याच्या जयंती प्रित्यर्थ प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मंजुळाबाई धुरंधर होत्या. तर प्रमुख व्याख्याते मा. ग.मा. पिंजरकर प्रदेश महासचिव गुरु रविदास सत्यशोधक समाज, प्रमुख पाहुणे मा. रमेश दांडगे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष धुरंधर यांनी केले तर आभार प्रदर्शन जनार्धन वाकोडे यांनी यांनी मानले. या प्रसंगी डॉ किशोर गव्हाळे, गजानन गव्हाळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.**

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**